# गॅसची किंमत दुप्पट होणार?!

## सरकारच्या मदतीने सार्वजनिक संपत्तीवर रिलायन्सचा डल्ला!

**भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे खासदार कॉ. गुरुदास दासगुप्ता यांचे सुप्रीम कोर्टात आव्हान!**

**४ मार्च २०१४ रोजी सुप्रीम कोर्टात सुनावणी**

आंधप्रदेशाच्या किनाऱ्यालगत KG-D6 बेसिन आहे. तेथून नैसर्गिक वायुची निर्मिती होते. ही निर्मिती करणाऱ्या भारतातील सर्वात मोठ्या औद्योगिक समुहाचे - RIL(Reliance Industries Ltd.) चे - उखळ पांढरे करण्यासाठी सत्तेतील उच्चपदस्थांनी कसे कारस्थान रचले, ते आपली अधिकाराची स्थाने वापरून कसे घडवून आणले व त्या औद्योगिक समुहास देशाच्या नैसर्गिक संपत्तीतून प्रचंड नफेखोरी करण्यास कसा वाव दिला ते आम भारतीय जनतेस सांगण्यासाठी ही पुस्तिका प्रकाशित करीत आहोत.

ही फसवणूक बेमालूम व्हावी म्हणून रंगराजन कमिटीच्या शिफारशी अंमलात आणत असल्याचा आव आणला गेला. या कमिटीवर नैसर्गिक वायुच्या निर्मितीबाबत व संबंधित तंत्रज्ञानाची जाणकार अशी कोणीही व्यक्ति नाही. या शिफारशींचा आधार घेत १ एप्रिल २०१४ पासून नैसर्गिक वायुची किंमत सध्याच्या ४.२ डॉलर्स दर MMBTU ऐवजी ८.४ डॉलर्स असेल असे घोषित करण्यात आले आहे.

नैसर्गिक वायुचा वापर मुख्यत्वे खते व वीज उत्पादनासाठी होतो. या दोन्ही मंत्रालयांनी वायुच्या किंमतीत अशी वाढ करण्यास स्पष्ट विरोध नोंदविला आहे. मंत्रीमंडळाच्या आंतरखाते विचारार्थ जी टिपणी केली जाते त्यात हा विरोध लेखी स्वरुपात केला आहे.

ह्या तथाकथित एक्स्पर्ट कमिटीने केलेली चलाखी स्पष्ट आहे. नैसर्गिक वायुची किंमत ठरवितांना त्यांनी वायुचा प्रत्यक्ष उत्पादन खर्च विचारातच घेतलेला नाही. कोणत्याही क्रयवस्तुची किंमत तीच्या उत्पादन खर्चावर आधारित न ठेवता

ठरविणे अशक्य आहे. श्री. रंगराजन सारख्या प्रसिद्ध अर्थतज्ञाच्या अध्यक्षतेखालील कमिटीने अशाप्रकारे प्रत्यक्ष उत्पादन खर्च विचारात न घेता नैसर्गिक वायुची किंमत मनमानीपणे ठरवावी, हे समजायलाच कठीण आहे. प्रा. रंगराजन यांना याचाही खुलासा करावा लागेल की सर्व गणिते डॉलरमध्ये का मांडण्यात आली आहेत? नैसर्गिक वायु भारताची संपत्ती आहे, कंत्राटदार भारतीय कंपनी आहे, वायुची निर्यात होणार नाही तर देशांतर्गतच उपयोग होणार आहे. मग किंमत अमेरिकन चलनात कशासाठी? सध्या रुपयाची किंमत डॉलरच्या तुलनेत घसरत असतांना या कंत्राटदार कंपनीस नफ्याचे वेगळेच घबाड देण्यात आले आहे.

अत्यंत प्राथमिक गोष्टींचा विचार न करता शिफारशी केल्या आहेत - उत्पादन खर्च विचारात घेतला नाही, आर्थिक -परिस्थितीवर काय परिणाम होतील याचा विचार केला नाही, किंमती परदेशी चलनात ठरविल्या - यावरून असा निष्कर्ष निघतो की कमिटी नियुक्त करणाऱ्या राजकीय मुखंडांनी कमिटीला आधीच ठरविलेल्या किंमतीची शिफारस करण्याचे काम सांगितले असावे. रंगराजन कमिटी ही त्या संगनमताच्या नाटकामधील दृश्य प्यादे असेल तर पडद्यामागचे सूत्रधार वेगळेच आहेत व त्यांना या औद्योगिक घराण्याच्या घशात प्रचंड नफा घालायचा आहे. प्रा. रंगराजन एकटेच दोषी नाहीत, इतरही तितकेच दोषी आहेत.

हे सूत्रधार म्हणजे पेट्रोलियम मंत्रालय, वित्त मंत्रालय आणि नियोजन मंडळ. या सर्वांनी रंगराजन कमिटीच्या शिफारशींनाही ओलांडून किंमती मान्य केल्या आहेत-फक्त रिलायन्स इंडस्ट्रीजच्या फायद्यासाठी. आणि याचे समर्थन काय दिले जाते आहे? रंगराजन कमिटीने केलेल्या शिफारशीपेक्षाही अधिक किंमत का द्यावी? तर म्हणे नफा जास्त तर गुंतवणूक जास्त! गुंतवणूकीसाठी ‘इन्सेटीव्ह’ गरजेचे आहे, असे समर्थन करण्यात येत आहे. परंतु आर्थिक प्रगतीचा इतिहास दर्शवितो की बाजारपेठ विकसित होत असेल, तेजीचे संकेत असतील तर आपोआपच देशी किंवा विदेशी भांडवलाची गुंतवणूक सुरू असते. देशाच्या सरकारने मात्र देशहित बाजूला ठेवून या उद्योग समुहाच्या फायद्याकरता भयानक पाऊल टाकले आहे.

जेव्हा नियोजन मंडळाला संसदीय कमिटीने प्रश्न केले तेव्हा सचिवांनी प्रांजळपणे कबूली दिली की नैसर्गिक वायुच्या किंमतीत वाढ करण्याची शिफारस करण्यापूर्वी त्यांनी आर्थिक परिस्थितीवर काय परिणाम होईल याचा विचार केलेला नव्हता. देशहिताचा विचार न करता नियोजन मंडळही एका उद्योग समुहाच्या हिताचा विचार करीत होते. वित्त मंत्रालयाचे उत्तर तर याहूनही बेशरम होते. त्यांनी स्पष्टच सांगितले की वायुची किंमत ठरवितांना त्यांनी वायुच्या उत्पादन खर्चाचा विचार केलेला नाही.

श्री विरप्पा मोईली, पेट्रोलियम खात्याचे मंत्री, हे तर देशाच्या या सर्वात मोठ्या उद्योग समुहाशी संगनमत करून आहेत. त्याला अधिक नफा मिळवून देणे हेच उद्दिष्ट त्यांनी त्यांच्या खात्याला घालून दिले असावे. त्यांनी शिफारस केलेली किंमत RIL ने मागितलेल्या किंमतीच्या जवळपास होती. ज्या कारणासाठी श्री. मोईलींना श्री एस. जयपाल रेड्डींच्या खुर्चीत बसविण्यात आले ते काम श्री मोईली-इमाने इतबारे करीत आहेत. रंगराजन कमिटीच्या शिफारशींपेक्षाही अधिक किंमत ठरावी यासाठी त्यांनी पेट्रोलियम खात्याच्या अधिकाऱ्यांचे सल्ले परत परत धुडकावून लावले.

जर ही नवी किंमत १ एप्रिल २०१४ पासून लागू होणार आहे तर मंत्रिमंडळाची एवढी घाई का चालली आहे? या महत्त्वाच्या मुद्यावर सरकारच्या मंत्रिमंडळात एकमत नव्हते. ऊर्जा खाते व खते खाते यांनी स्पष्ट विरोध नोंदविला असतांना, पेट्रोलियम खात्यातील सिनियर अधिकाऱ्यांनीही पेट्रोलियम मंत्र्यांच्या मताला विरोध केलेला असतांना, सरकारने अशा प्रसंगी वापरण्यात येणारी नेहमीची रीत का वापरली नाही? मंत्र्यांचा गट स्थापन करून इतर संबंधित घटकांशी, राज्य सरकारांशी सल्लामसलत का केली नाही? रंगराजन कमिटी - जिच्यात या विषयावरील एकही एक्स्पर्ट सदस्य नव्हता - गठित करण्याचे प्रयोजन काय? रिलायन्स इंडस्ट्रीजच्या दबावाला सरकार बळी पडले हेच खरे आहे.

सन २०१४ च्या निवडणूकी डोळ्यासमोर ठेवून खुल्लम खुल्ला केलेले हे कारस्थान आहे. देशातल्या सर्वात मोठ्या राजकीय गुंतवणूकदारासाठी- जो देशातील सर्वच राजकीय मुखंडांना फंड पुरवतो- प्रचंड नफ्याची तजवीज करून मोठ्या देणगीची अपेक्षा केली जात आहे. ज्या घाईघाईने एप्रिल २०१४ ला कार्यान्वित होणारा करार केला जात आहे त्याने या निर्णयाबाबत शंका उपस्थित होतात. RIL त्याच्या अनैतिक औद्योगिक उलाढीलींबाबत कुप्रसिद्ध आहेच. आता या प्रकरणात RIL च्या गैरकायदेशीर व्यवहारास सरकार बळी पडलेले दिसते. RIL ची वायुची किंमत वाढवून देण्याची पहिली मागणी फेटाळली गेली आणि वायुच्या उत्पादनात घट सुरू झाली, हा केवळ योगायोग निश्चितच नव्हता. सरकारने RIL च्या मागणीनुसार वायुची किंमत वाढवून द्यावी यासाठी सरकारचे कान पिळण्यासाठी केलेली ही कृती होती. या नंतर घडत गेलेल्या घटनांकडे बारकाईने पाहिले तर सरकारला ब्लॅकमेल करण्यात RIL यशस्वी झाले असेच म्हणावे लागेल.

**हा घटनाक्रम पहा :**

* KG-D6 हा ब्लॉक सन २००० मधे RIL ला NELP-I च्या निविदेनुसार

देण्यात आला. RILला त्यांनी उत्पादनासाठी गुंतविलेला भांडवलाचा १०० % टक्के खर्च सरकारने द्यायचा आहे.

* प्रत्यक्ष उत्पादन २००९ साली सुरू झाले व पाच वर्षांकरिता नैसर्गिक वायुची किंमत $४.२ प्रति युनिट ठरविण्यात आली.
* ठरलेल्या उद्दीष्टाप्रमाणे उत्पादन फक्त पहिल्या वर्षी काढण्यात आले.
* RIL ने जून २०१० मध्येच वायुची किंमत वाढवून देण्याची मागणी केली. पेट्रोलियम खात्याने ऑगस्ट २०१० मध्ये ती मागणी फेटाळून लावली. सप्टेंबर २०१० पासून KG-D6 चे उत्पादन घटू लागले. ह्या 'योगायोगामुळे' उत्पादन जाणून बुजून घटविण्यात येत आहे अशी शंका उत्पन्न झाली.
* KG-D6 मधून होणारे उत्पादन गेल्या वर्षी ठरलेल्या ८०MMSCMD या स्तराऐवजी फक्त २५ MMSCMD एवढेच झाले आणि चालू वर्षात ते १४ MMSCMD पर्यंत घसरले आहे.
* ही घट वस्तुतः उत्पादनात परावर्तीत केल्यास १३५०० MW उर्जेचा तुटवडा निर्माण झाला तर युरियाच्या उत्पादनात ३०५ लाख टनाची घट निर्माण झाली.
* हा देशांतर्गत निर्माण होणारा वायु आयातीने भरून काढायचा तर रु. ४८००० करोडचा तोटा होईल. सन २०१०-११, २०११-१२, २०१२-१३ चा एकत्रित तोटा १,१३,००० कोटी रुपये होईल.
* सन २०११-१२ पर्यंत झालेल्या एकूण उत्पादन तूटीची भरपाई म्हणून सरकारने रिलायन्सवर १०० कोटी डॉलर्सचा दंड लावला होता. आणि तो वसूल करण्यासाठी लवादासमोर सुनावणी सुरू केली होती.
* हेच तत्त्व २०१२-१३ व चालू वर्षाला लावले गेले पाहिजे. यानुसार २०१२-१३ मध्ये ५५ MMSCMD वायु उत्पादन कमी झाले म्हणून १७० कोटी डॉलर दंड लावून वसुल केले पाहिजेत व चालू वर्षाकरीता २४० कोटी डॉलर वसूल केले पाहिजेत. परंतु २०१२-१३ व चालू वर्षाकरीता कमी उत्पादनाबद्दल दंडवसूलीची नोटीसही RILला देण्यात आलेली नाही.
* नोव्हेंबर २०१२ मध्ये श्री जयपाल रेड्डी यांना पेट्रोलियम खात्याचे मंत्रीपद सोडावे लागले. त्यांनी उत्पादनत्रूटीबाबत RIL वर दंडात्मक कारवाई सुरू केली होती व किंमत वाढवून देण्याची मागणीही फेटाळून लावली होती, त्यांच्या खातेबदलाचे कारण त्यांनी RIL ला अकारण खास सवलती मंजूर

करण्यास दिलेला नकार, हेच असावे, असा सार्वत्रिक समज होता.

* सन २०१२-१३ मध्ये गेल्या वर्षी झालेल्या उत्पादन त्रूटीसाठी सरकारने १७० करोड डॉलरचा खर्च नामंजूर करणे गरजेचे आहे. चालू वर्षी हा दंड २४० करोड डॉलर असला पाहिजे. परंतु सरकारतर्फे पुढील नोटीसा पाठविल्याच गेलेल्या नाहीत. गेल्या वर्षीच्या नोटीसबाबत जी लवादाची कारवाई सुरू झाली ती नवे पेट्रोलियम मंत्री नियुक्त झाल्यानंतर बंद करण्यात आली आहे.

## रंगराजन कमिटी

* सध्याचा KG-D6 ब्लॉकमधून उत्पादित होणाऱ्या वायुंची किंमत ४.२ डॉलर प्रति युनिट (MMBTU) आहे.
* RIL ची मागणी आहे की $१३.८ प्रति युनिट एवढी किंमत मिळावी. म्हणजे ज्या किंमतीने वायु आयात केला जातो, ती किंमत मिळावी (ह्यात क्रूड तेलाची किंमत २०१४-१५ साली व त्यापुढे प्रति बॅरल $११० राहील असे गृहित धरण्यात आले आहे).
* सरकारने एप्रिल २०१२ मध्ये डॉ. सी. रंगराजन यांच्या अध्यक्षतेखाली एक विशेषाधिकार असलेली कमिटी नियुक्त केली व त्यांनी वायुची किंमत व इतर बाबींचा अभ्यास करावा असे काम दिले.
* रंगराजन कमिटीने आपला अहवाल डिसेंबर २०१२ मध्ये सरकारला सुपूर्द केला.
* रंगराजन कमिटीने एक नवी पद्धत सुचविली आहे. त्यानुसार (१) भारत आयात करीत असलेल्या LNG ची किंमत निर्यात करणाऱ्या देशांत वायु विहिरींच्या बाहेर किती असेल त्याचा अंदाज बांधायचा; (२)अमेरिकेसाठी हेन्री हबने ज्या विविध जागतिक बाजारपेठांतील सरासरी किंमती काढलेल्या असतात त्या; युरोपमध्ये नॅशनल बॅलंसिंग पाईंटच्या ज्या किंमती आधारभूत धरतात त्या व जपानसाठी ज्या किंमती आधारभूत धरल्या जातात त्या, यांची सरासरी काढायची व सरते शेवटी (१) व(२) या दोन सरासरींची सरासरी काढायची.
* सरकार या प्रक्रियेची ५ वर्षानंतर पुनर्तपासणी करून वायुबाजारात स्पर्धेतून निश्चित झालेल्या किंमतीशी पडताळणी करेल.
* रंगराजन समितीने घालून दिलेल्या सूत्रानुसार एप्रिल २०१४ पासून वायूची किंमत $८.४ प्रति युनिट निघते.

## EGOM/CCEA ची रंगराजन कमिटीवरील टीप्पणी व ऊर्जा व खते खात्यांच्या हरकती.

* EGOM(Empowered Group of Ministers)व CCEA(Cabinet Committee on Economic Affairs) यांनी रंगराजन कमिटीच्या शिफारशींचा अभ्यास करून निर्णय करण्याची प्रक्रिया सुरू केली.

* खते व उर्जा खात्यांनी RIL ची मागणी आणि रंगराजन कमिटीच्या शिफारशींनाही जोरदार विरोध केला. त्यांनी सांगितले की या शिफारशी मान्य केल्या तर उर्जा व युरियाच्या किंमती भरमसाठ वाढतील व सरकारवर प्रचंड आर्थिक बोजा पडेल.

* खते डिपार्टमेंटने म्हटले आहे की भारतीय RIL आयातीची जागतिक किंमतींची प्रमाणबद्ध सरासरी काढली (रंगराजन कमिटी साधी सरासरी सुचविते) तरी किंमत २ डॉलर प्रति युनिटने कमी होईल, म्हणजे सुमारे $६ प्रति युनिट येईल. याने ही सरकारची खूप बचत होईल. तसेच नैसर्गिक वायुच्या उत्पादनाच्या प्रत्यक्ष खर्चही लक्षात घेतला पाहिजे. सार्वजनिक कंपन्यांकडे उपलब्ध असलेल्या आकडेवारीनुसार तो $३.६ प्रति युनिट आहे. ही रक्कम देशांतर्गत वायुची किंमत ठरविण्यासाठी अधिक सुयोग्य आहे.

* खते खात्याने हेही नमूद केले की युरियाचे सध्या जेवढे उत्पादन होते त्यात रु. १०००० कोटी सबसिडीची वाढ होईल. १२ व्या योजनेतील प्रस्तावित उत्पादन क्षमता गृहित धरली तर १२ व्या योजनेच्या शेवटी ही सबसिडीची रक्कम रु. १७००० करोडपर्यंत पोहोचेल.

* उर्जा खात्याने त्यांच्या हरकती नमूद करतांना इशारा दिला की वायुची किंमत $५ हून अधिक कुठल्याही परिस्थितीत होता कामा नये. त्यांनी असेही सूचित केले की वायुची किंमत रुपयामध्ये असावी. त्यांनी म्हटले आहे की देशांतर्गत वायुची किंमत वाढल्यास राज्य सरकारे अडचणीत येतील, एवढेच नव्हे तर सरकारने सुरु केलेल्या आर्थिक सुधारणांचा परिणामही शून्यावर येऊन पोहोचले.

* किंमती रंगराजन कमिटीच्या शिफारशींनुसार $८ प्रति युनिट जरी धरल्या तरी ऊर्जा निर्मितीचा खर्च रु. ६.४० प्रति युनिट होतो व वीजेची एवढी किंमत देणे केवळ अशक्य आहे. अशा वीजनिर्मिती केंद्रांना ऑर्डर्स मिळणेही अशक्य होऊन बसेल. नवे वायु आधारित ऊर्जा प्रकल्पही आर्थिक दृष्ट्या अव्यवहार्य होतील.

* सध्याच्या वायु आधारित प्रकल्पांवर दरवर्षी २९८०० करोड रुपयांचा बोजा

वाढेल. सध्या जे नवे प्रकल्प बांधले जात आहेत तेही धरले तर हा बोजा ४६३६० करोड रुपये होईल.

**वित्त मंत्रालय व योजना आयोगाचे किंमत वाढीबद्दल मत :**

* योजना आयोगाचे मत रिलायन्सच्या मागणीनुसार १३ व्या योजनेच्या सुरुवातीपासून आयातीची किंमत द्यावी, असे आहे. दरम्यान रिलायन्सला एकूण उत्पादनाच्या १०% वायु बाजारभावाने विकण्याची मुभा पुढील वर्षी द्यावी, २०१५-१६ मध्ये ती १५% करावी, २०१६-१७ मध्ये २०% व तदनंतर १००% वायु उत्पादन रिलायन्सच्या मागणीप्रमाणे विकण्याला परवानगी द्यावी. या सूत्रानुसार ५ वर्षांच्या काळात सरासरी किंमत $ ११.५ प्रति युनिट येते. श्री. बि.के.चतुर्वेदी हे योजना आयोगात ऊर्जा विभागातून असलेले सदस्य, रंगराजन समितीचे सदस्य होते व रंगराजन कमिटीच्या अहवालावर त्यांची सही आहे. तरी योजना आयोगाने रंगराजन कमिटीच्या शिफारशींहून खूपच अधिक किंमती मंजूर कराव्या हे आश्चर्यकारक आहे.
* वित्त मंत्रालयाने सुचविले आहे की रंगराजन कमिटीच्या शिफारशींऐवजी कातार देश दीर्घ मुदतीच्या वायु खरेदी करारासाठी जी किंमत लावतो ती आधारभूत धरावी. यानुसार सन २०१४-१५ पासून ही किंमत $ ११ प्रति युनिट होईल. ही किंमत सुद्धा रंगराजन शिफारशीपेक्षा अधिक आहे. CCEA टिप्पणीमध्ये वित्त मंत्रालयाने उर्जा व युरिया खात्यांना लागणाऱ्या सबसिडीबाबत अवाक्षर काढलेले नाही.

## पेट्रोलियम खात्याचे किंमतीतील वाढीबाबत मत.

पेट्रोलियम खात्याचा RIL च्या मागणीस पाठिंबाच होता व रंगराजन कमिटीच्या शिफारशीपेक्षा अधिक किंमत देण्याचा त्यांचा निर्धारच दिसला. त्यांनी सुचवले की पहिल्या तीन वर्षात रंगराजन कमिटीच्या किंमतीपासून टप्प्याटप्प्याने आयातीच्या किंमतीपर्यंत वाढ करावी व शेवटच्या दोन वर्षात आयातीची किंमत द्यावी. याचा अर्थ असा की १२व्या योजनेतील २०१४-१५, २०१५-१६, व २०१६-१७ या वर्षांमध्ये किंमत अनुक्रमे $ ८, $ १०, $ १२ असेल तर १३व्या योजनेच्या पहिल्या दोन वर्षांत ती RIL च्या मागणीनुसार असेल. पेट्रोलियम मंत्र्यांनी टाकलेल्या पावलांवरून हे स्पष्ट होत होते की मंत्री महोदयांना ऊर्जा व युरिया खात्यांच्या हरकती दुर्लक्षित करायच्या इतकेच नव्हे तर रंगराजन कमिटीच्या शिफारशीपलिकडे जाऊन किंमत ठरवायची होती.

## किंमत वाढीने सबसिडीची वाढ

खनिज तेलाची किंमत $ ११० प्रति बॅरल व KG-D6 ब्लॉकमधून ५० MMSCMD एवढे उत्पादन गृहित धरून साधी आकडेमोड केली तरी सरकारवर एकूण किती सबसिडीचा बोजा पडेल याचा अंदाज करता येतो. सरकार व RIL मध्ये १०:९० या प्रमाणात नफ्याचे वाटप होते ते ही गृहीत धरू. तर खालील परिस्थिती उद्भवू शकते.

सरकारने रंगराजन कमिटीच्या शिफारशी स्वीकारल्या तर ($ ८.४ प्रति युनिट) उर्जा व युरिया खात्याला प्रतिवर्षी रु. १८००० करोड एवढी वाढीव सबसिडी द्यावी लागले. ही अर्थातच RIL ला मिळेल व त्यांचा ९०% नफा रु. १६२५० करोड पर्यंत वाढले. म्हणजे २०१४-१५ ते २०१८-१९ या पाच वर्षांच्या काळात रु. ९०००० करोडची अधिक सबसिडी द्यावी लागेल. RIL चा नफा त्याच काळासाठी रु. ८१००० करोड होईल.

योजना आयोगाचे सूत्र वापरले तर एकूण सबसिडीची वाढ रु. ५३२८० करोड होईल. ही रंगराजन कमिटीच्या शिफारशीमुळे आलेल्या खर्चाव्यतिरिक्त असेल. (यातून रु. ४८००० करोडचा निव्वळ नफा RIL ला मिळेल.) म्हणजे पाच वर्षाच्या काळात एकूण सबसिडी रु. १,४३,२८० करोड व RIL चा नफा रु. १,२९,००० करोड.

वित्त मंत्रालयाने सुचविलेल्या सूत्रानुसार सबसिडी, रंगराजन कमिटीच्या खर्चाव्यतिरिक्त, पाच वर्षात रु. ५२००० करोडने वाढेल व RIL चा नफा रु. ४७,००० करोड होईल. याचा अर्थ पाच वर्षात एकूण सबसिडी रु. १,४१,००० करोड व RIL चा नफा रु. १,२८,००० करोड.

पेट्रोलियम मंत्रालयाच्या सूत्रानुसार १२व्या योजनेत सबसिडी रु. २२५०० करोडने वाढेल तर १३व्या योजनेच्या पहिल्या दोन वर्षांसाठी प्रत्येक वर्षाला रु. २१७५० करोड होईल; म्हणजे रंगराजन सूत्रापेक्षा रु. ७६,००० करोड अधिक व RIL चा नफा रु. ६८,४०० करोड. याचा अर्थ रु. १,६६,००० करोड एकूण सबसिडी व रिलायन्सचा एकूण नफा रु. १,४९,००० करोड. पेट्रोलियम खाते अशाप्रकारे रिलायन्सची मागणी पूर्णपणे मान्य करण्याच्या तयारीत होते, असे खेदाने म्हणावे लागते.

## या धोक्यांबाबत पंतप्रधानांना पाठविलेली तीन पत्रे

ह्या धोक्यांचा इशारा पंतप्रधानांना दि. २३ मे २०१३ रोजी पत्र लिहून प्रथम

देण्यात आला. त्यात मागणी केली गेली की नैसर्गिक वायु ही देशातील जनतेची संपत्ती आहे व त्याची किंमत ठरवितांना हा वायु कोणा एका व्यक्तिच्या नफेखोरी करता नसून तो जनतेच्या भल्यासाठी वापरला जाईल, ही भूमिका स्पष्ट झाली पाहिजे.

या पत्राद्वारे पंतप्रधानांनी यात जातीने लक्ष घालून हा व्यवहार वेळीच थांबवावा, अशी विनंती करण्यात आली.

पंतप्रधानांना लिहिलेल्या या पहिल्या पत्रानंतर व ही बाब जाहीर झाल्यावर पेट्रोलियम मंत्रालयाने एक प्रेस स्टेटमेंट काढून दिशाभूल करणारी निवेदने केली. हे ही पंतप्रधानांच्या ध्यानी दि. १०/०६/२०१३ रोजी दुसरे पत्र लिहून निदर्शनास आणून देण्यात आले आहे.

पेट्रोलियम मंत्र्यांनी असेही निवेदन प्रसृत केले की ''नैसर्गिक वायुची प्रस्तावित दरवाढ ही पंतप्रधानांनी नियुक्त केलेल्या व त्यांचे आर्थिक सल्लागार श्री. सी. रंगराजन यांच्या अध्यक्षतेखालील कमिटीने केलेल्या शिफारशी नुसारच आहे.'' निवेदनात त्यांनी पुढे म्हटले की ''भा.क.प.चे नेते, पेट्रोलियम खात्याने रंगराजन कमिटीच्या शिफारशीपासून फारकत घेतली आहे, असे चुकीचे विधान करीत आहेत.''

परंतु CCEAच्या ताज्या टिपणानुसार (दि.२७/०५/२०१३) दिसते की पेट्रोलियम मंत्रालयाने जनतेची दिशाभूल करणारी धादांत खोटी विधाने केली आहेत. ज्या पाच वर्षांकरीता किंमतीचा फॉर्म्युला ठरविला जातो आहे, त्यातील शेवटच्या दोन वर्षांकरीता आयात दरानुसार $१४ प्रति युनिट किंमत द्यावी, अशी ऑर्डर पेट्रोलियम मंत्र्यांनी काढली होती. ही सत्य परिस्थिती असतांना पेट्रोलियम मंत्री रंगराजन कमिटीच्या शिफारशी ''तंतोतंत पाळल्या जात आहेत'' हे जनतेला कुठल्या तोंडाने सांगत आहेत?

पंतप्रधानांना लिहिलेल्या पहिल्या पत्रानंतर व ही बाब जाहीर झाल्यावर, पेट्रोलियम मंत्री पायरी पायरीने दर वाढवीत जाण्याबाबत बोलायचे बंद झाले. पण १३व्या योजनेत आयात किंमत - म्हणजे $१४ प्रति युनिट - देण्याची शिफारस रेटतच राहिले. हे CCEA च्या ताज्या टिपणीमधील पॅरा ३.१.१० मधून स्पष्ट होते: ''वर म्हटल्यानुसार, १२व्या पंचवार्षिक योजनेच्या शेवटापर्यंत वायुची किंमत बाजारावर आधारित करण्यासाठीचा कार्यक्रम केळकर समिती वेगळा तयार करीत आहे, आणि तो CCEA समोर लवकरच ठेवला जाईल.'' केळकर समितीस घालून दिलेल्या मॅन्डेटवरून स्पष्ट होते की पेट्रोलियम मंत्र्यांनी ठरवूनच टाकले होते की १३व्या पंचवार्षिक योजनेत आयात किंमत द्यायचीच.

पेट्रोलियम मंत्र्यांनी केळकर समितीची स्थापना करणेही आश्चर्यकारच आहे. पंतप्रधानांनी स्थापना केलेल्या रंगराजन कमिटीच्या शिफारशींचा अभ्यास करण्याचे काम केळकर समितीला देण्यात आले. रंगराजन कमिटीने ५वर्षांसाठी फॉर्म्युला सुचविलेला असतांना परत केळकर समिती त्यावर बसविणे याचा हेतू हाच होता की पेट्रोलियम मंत्र्यांची आयात किंमत देण्याची शिफारस त्यात बसवायची. थोडक्यात केळकर समिती म्हणजे एक थोतांड होते.

तसेच श्री.बी.के. चतुर्वेदी, योजना आयोगाचे सदस्य (उर्जा) आणि मंत्रीमंडळाचे माजी सचिव हे रंगराजन कमिटीचे सदस्य होते. पण योजना आयोगाने या प्रकरणामध्ये जी निर्णय प्रक्रिया केली त्यात त्यांना सहभागीच करुन घेतले नाही. केळकर समितीवर योजना आयोगाचे प्रतिनिधी म्हणून श्री. चतुर्वेदींना न पाठविता योजना आयोगाच्या एका ज्युनिअर अधिकाऱ्याची वर्णी लावण्यात आली. आणि योजना आयोगाची नैसर्गिक वायुला १३व्या पंचवार्षिक योजनेत आयातीची किंमत द्यावी, ही शिफारस आधीच जाहिर झाली होती.

पत्रात रंगराजन फॉर्म्युल्यात सांगितलेल्या किंमतीपेक्षा किती तरी अधिक किंमत सुचविण्यासाठी पेट्रोलियम मंत्रालय व योजना आयोग करीत असलेल्या क्लृप्त्यांकडे खास लक्ष वेधण्यात आले. वित्त मंत्रालयाने $ 11 प्रति युनिट - म्हणजे रंगराजन फॉर्म्युल्याहून $3 अधिक सुचविले होते. योजना आयोगाने पहिल्या तीन वर्षांकरीता एकूण उत्पादनाच्या अनुक्रमे १०%, १५% व २०% साठी $१४ प्रति युनिट व शेवटच्या दोन वर्षांकरता पूर्ण उत्पादनासाठी $ १४ प्रति युनिट असा आयातीचा दर सुचविला होता. वित्त मंत्रालय व योजना आयोगाने ह्या दरवाढीचे समर्थन "RIL ला भांडवल गुंतवणुकीसाठी प्रोत्साहन" म्हणून केले. RIL ला आताच भरपूर प्रोत्साहन देण्यात आलेले आहे : नफ्याचा ९०% वाटा आणि उत्पादनासाठी केलेल्या सर्व खर्चाची १००% भरपाई. त्यांच्या नफ्यावर कर माफ आहे. त्यात आणखी दरवाढ प्रोत्साहनासाठी म्हणणे हे RIL ला देशाच्या नैसर्गिक संपत्तीतून अफाट नफा मिळवून देण्याचे एक निमित्त आहे. वायु उत्पादनाचा प्रत्यक्ष खर्च किती व या वायुच्या दरवाढीने RIL ला किती नफा होईल, त्याचा काहीही अभ्यास करण्यात आलेला नाही. रंगराजन कमिटीच्या शिफारशीनेही उर्जा व खत क्षेत्रावर किती बोजा पडेल याचा अभ्यास ना वित्त मंत्रालयाने ना योजना आयोगाने केला आहे.

हे दुसरे पत्र जाहीर झाल्यावर पेट्रोलियम मंत्र्यांनी निवेदन केले की नैसर्गिक वायुच्या व्यापारातील विविध शक्ती निर्णय प्रक्रियेत बाधा आणण्यासाठी क्रियाशील

आहेत. या निवेदनाला सविस्तर उत्तर देण्यात आले. माझ्या दोन पत्रात केलेल्या KG-D6 वायुच्या किंमती बाबतच्या मुद्यांवर चर्चा करावी, असा फोन मला मंत्रीमहोदयांनी केला. मंत्रीमहोदय खुल्या मनाने चर्चेचे आमंत्रण देत आहेत असा माझा समज झाला. पण दुसऱ्या दिवशीच्या वृत्तपत्रात त्यांनी आरोप केलेले आढळले की मी खनीज तेल/नैसर्गिक वायुच्या क्षेत्रात कार्यरत शक्तींच्या सांगण्यानुसार हरकती घेतो आहे! मग चर्चा करण्यासाठी भेटण्यात अर्थच नव्हता. मी ते चर्चेचे आमंत्रण फेटाळले.

मी कोणाची तरी तळी उचलून धरतो आहे, ह्या आरोपाचे मी खंडन करीत बसावे असेही मला वाटत नाही. पण मंत्री महोदयांनी जे इतर मुद्दे केले त्याला मात्र मी जरुर प्रत्युत्तर देऊ इच्छितो :

१. मंत्री महोदय म्हणतात भांडवल गुंतवणुकाला प्रोत्साहित करण्यासाठी उत्पादित वायुला बाजार भाव देणे आवश्यक आहे. नफ्यातील ९०% वाटा, सर्व खर्चाची १००% भरपाई व करमुक्त नफा हे प्रोत्साहनाकरीता पुरेसे नाही का? त्यावर अधिक किंमतीचे समर्थन करणे हे दुसरे तिसरे काही नसून RIL च्या पदरात अफाट नफा ओतण्याचे निमित्त आहे, देशाच्या नैसर्गिक संपत्तीची लूट आहे.

२. मंत्री महोदय म्हणतात की उत्पादनात वाढ झाली की आंतरराष्ट्रीय बाजारपेठीतील किंमतींच्या चढ-उतारापासून आपली सुटका होईल. पण RIL ला आयातीच्या किंमती एवढी किंमत द्यावी याचा आपण चंगच बांधला असतांना आंतरराष्ट्रीय किंमतीच्या चढ-उतारापासून आपली सुटका कशी होणार? उलट आपण आंतरराष्ट्रीय तेल/वायूच्या किंमती बांधणाऱ्या शक्तींचे शिकार नाही होणार?

३. मंत्री महोदय म्हणतात की कायदामंत्री या नात्याने त्यांनीच नैसर्गिक वायु ही देशाची सार्वभौम संपत्ती आहे असे घोषित करवून घेतले, व RIL ला ते काही मदत वगैरे करीत नाहीत. पण हा तर सुप्रीम कोर्टाच्या संपूर्ण खंडपीठाचा निर्णय होता! CCEA च्या ताज्या टीपणीत (२७.०५.२०१३) मंत्री महोदयांनी या सुप्रीम कोर्टाच्या निर्णयाचा उल्लेख अस्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. CCEAच्या आधीच्या टिपणीत (१४.०५.२०१३) पॅरा २.५ मध्ये म्हटले होते की करारातील काही कलमे सुप्रीम कोर्टाच्या ऑर्डर मध्ये घालून दिलेल्या तत्वांच्या विरोधी असतील तर ती दुय्यम रहातील. मंत्रीमहोदयांनी त्यांच्या हाताखालच्या अधिकाऱ्यांचे न जुमानता हा उल्लेख नव्या टिपणीत गाळून टाकला.

४. मंत्री महोदयांनी दावा केला की ते रंगराजन फॉर्म्युल्यापेक्षा कमी किंमत देत आहेत. हे चक्क खोटे विधान आहे. CCEA ची २७.०५.२०१३ ची टीपणी त्यांच्या सांगण्यावरून बदलण्यात आली व रंगराजन फॉर्म्युल्याच्या शेवटच्या दोन

वर्षात आयात किंमत द्यावी, असे घालण्यात आले. म्हणजे रंगराजन फॉर्म्युल्यापेक्षा कितीतरी अधिक किंमत.

५. मंत्री महोदयांनी दावा केला की या दरवाढीचा सार्वजनिक कंपन्यांना ताबडतोब फायदा होईल तर RIL ला पुढच्या वर्षापासूनच होईल. नैसर्गिक वायुच्या किंमती वाढल्यामुळे सार्वजनिक कंपन्यांना जो नफा होतो तो शेवटी सरकारकडेच इंधन सबसिडीचा वाटा, डेव्हिडंड, नफा यातील वाटा या मार्गांनी येतो. औद्योगिक घराण्यांना होणाऱ्या अफाट नफ्याचे काय होते?

त्यानंतर पंतप्रधानांना तीसरे पत्र १८.६.२०१३ला पाठविण्यात आले. त्यात लवादाची कारवाई थांबविल्याबद्दल, RILकडे करारापेक्षा किती तरी अधिक उत्पादक क्षेत्र ठेवण्याला संमती दिल्याबद्दल,हरकती घेतल्या होत्या.

हे लक्षात ठेवले पाहिजे की RIL ने आपल्या सर्व खर्चाची भरपाई नैसर्गिक वायुच्या विक्रीतून करून घेतली आहे. लवादाची प्रक्रिया बंद होणे त्यांच्या पथ्यावरच पडले आहे. लवाद बंद झाल्याने सरकारला दंडाची १०० कोटी डॉलरची रक्कम मिळणार नाही. एकटा पेट्रोलियम मंत्री अशा प्रकारे लवाद बंद करून एखाद्या कॉर्पोरेटचा दंड माफ कसा काय करू शकतो?

पेट्रोलियम मंत्री उत्पादन वाढविण्यासाठी उत्तेजन देणे गरजेचे आहे, असा दावा करतात. पण जाणून बुजून उत्पादन घटविले जात असेल तर शिक्षेचे काय? सरकार औद्योगिक घराण्यांना प्रोत्साहनपर फक्त गाजर दाखविते पण त्यांनी द्वाडपणा केला तर शिक्षेची छडी मात्र सरकारकडे नाही!

दि. १६/०६/२०१३ रोजी एक विधान करून पेट्रोलियम मंत्रीमहोदयांनी तर कहरच केला आहे. CAG ने अशी शिफारस केली होती की,

''पेट्रोलियम व नैसर्गिक वायु मंत्रालयाने करारातील संपूर्ण क्षेत्रफळ ''शोध क्षेत्रफळ'' म्हणून ठरवण्याच्या निर्णयाचे पुनरावलोकन नियमांनुसारच करावे. तसेच पाहिली व दुसरी शोध मोहीम संपल्यावर २५% सोडून द्यायचे क्षेत्रफळ ठरवावे.''

CAG च्या शिफारशी व करारातील तरतुदींना धरून DGH (डायरेक्टर जनरल ऑफ हायड्रोकार्बन्स) यांनी RIL कडच्या संपूर्ण क्षेत्रफळाचा अभ्यास केला व संपूर्ण क्षेत्रफळाच्या ८६% क्षेत्रफळ RIL ने करारानुसार परत करावे, अशी शिफारस केली. १६.०६.२०१३ रोजी पेट्रोलियम मंत्री महोदयांनी वृत्तपत्रांमध्ये असे पत्रक प्रसिद्ध केले की ते याबाबीत बारीक सारीक तांत्रिक बाबींना महत्त्व देणार नाहीत व DGH ची शिफारस अमान्य करायच्या तयारीत ते आहेत. याचा अर्थ असा की कराराच्या तरतुदीं विरुद्ध व CAG च्या शिफारशींविरुद्ध हा पूर्ण पट्टा RIL

कडेच राहील. हा RIL ला होणारा वेगळाच व असमर्थनीय प्रचंड फायदा होणार आहे.

म्हणून पंतप्रधानांना कळकळीची विनंती करण्यात आली होती की त्यांनी स्वत: लक्ष घालून लवादाची प्रक्रिया चालू राहील असे पहावे, तसेच उत्पादन घटविण्याबद्दल त्या त्या वर्षांसाठी नव्या दंडाची आकारणी करावी व CAG व DGH च्या शिफारशींनुसार RIL ला क्षेत्रफळ परत करण्यास बाध्य करावे.

## डाव्या पक्षांचे संयुक्त निवेदन

त्यानंतर डाव्या पक्षांनी दि. २४.०६.२०१३ संयुक्त निवेदन प्रसारित केले. त्यात KG-D6 बेसिनमधून काढलेल्या नैसर्गिक वायुची किंमत वाढविण्याच्या सरकारी हालचालींच्या पार्श्वभूमीवर वरील मुद्दे ठळकपणे मांडले.

त्यात स्पष्ट करण्यात आले की आधीच सरकारी तिजोरीचा खडखडाट झालेला असतांना हा वाढीव सबसिडीचा बोजा सरकारला पेलविणार नाही व त्यांना खते व वीजेचे दर वाढवावेच लागेतील.

ह्या निवेदनात हेही लक्षात आणून दिले गेले की अर्थव्यवस्थेत मंदी येत असतांना व चलनफुगवटा सतत चिंतेचा विषय असतांना एवढी दरवाढ भारतीय अर्थव्यवस्थेला मरणासन्न करून टाकेल व देशाच्या जनतेवर, विशेषत: शेतकऱ्यांवर प्रचंड संकट कोसळेल. अशी आग्रही मागणी केली गेली ही दरवाढ तूर्तास स्थगित करावी. सरकारने प्रस्तावित दरवाढ करण्यापूर्वी संपूर्ण सत्य परिस्थिती कथन करावी आणि सर्व संबंधितांबरोबर चर्चा करावी.

## CCEA चा दरवाढीबाबतचा निर्णय व परिणाम

CCEA ने सरते शेवटी २७.०६.२०१३ रोजी रंगराजन सूत्रानुसार १.०४.२०१४ पासून नैसर्गिक वायुचा दर पाच वर्षांसाठी $८.४/MMBTU करण्याचा निर्णय घेतला. त्यांनी पेट्रोलियम मंत्रालय, वित्त मंत्रालय व योजना आयोगाच्या, रंगराजन सूत्रापेक्षाही अधिक दर देण्याच्या शिफारशी अमान्य केल्या. पंतप्रधानांना मी दि. १५.०७.२०१३ रोजी चौथे पत्र लिहिले. CCEA च्या निर्णयानंतर सरकारमधील दोन ज्येष्ठ मंत्री जी परस्पर विरोधी विधाने करीत होते व गोंधळ निर्माण करीत होते त्याबाबत हे चौथे पत्र होते.

CCEA च्या निर्णयानंतर दुसऱ्या दिवशी दि. २८.०६.२०१३ ला वित्त मंत्रीमहोदयांनी मिडियाला संबोधित केले. ते म्हणाले,

''सध्या आम्ही फक्त गॅस उत्पादकांना किती दर द्यायचा ते ठरविले आहे. याचा अर्थातच ग्राहकांवर परिणाम होईल. पण ग्राहकाला लागू होणारे दर आता निश्चित केलेले नाहीत. वीज प्रकल्पात अथवा खत कारखान्याला किती दराने वायु द्यायचा जेणे करून ग्राहकांना परवडेल ते आतापासून एप्रिल २०१४ पर्यंत ठरवता येईल.''

वित्तमंत्री, ज्यांना अर्थसंकल्पात सब्सिडीची तरतूद करावी लागते, ते असे विधान करीत आहेत की वायुदर आता ठरवतो, सब्सिडीचे नंतर बघू! निर्णय घेतांना उत्पादक आणि ग्राहक या दोघांचे हित लक्षात घेतले पाहिजे. **इथे उत्पादकाच्या (RIL) हिताचा विचार केला आहे पण त्याचा उर्जा व युरिया क्षेत्रावर व सरतेशेवटी ग्राहकावर काय परिणाम होईल या विचार केलेला नाही, हा वित्त मंत्रीमहोदयांचा बेजबाबदारपणा आहे.**

वायुदराबाबत गोंधळ निर्माण करण्याचा आणखी एक प्रयत्न म्हणजे वित्तमंत्रालयाने पेट्रोलियम मंत्रालयाला दि.५.०७.२०१३ रोजी पाठविलेली नोट आणि त्यावर पेट्रोलियम मंत्र्यांनी दिलेली प्रतिक्रिया होय. हे बऱ्याच वृत्तपत्रात छापून आले. दोन वेगवेगळ्या वृत्तांमधील प्रतिक्रियांचा हवाला देत वित्त मंत्रालयाची नोट पेट्रोलियम मंत्रालयाला योग्य ती पावले उचलण्याचे सुचविते. त्यात म्हटले आहे, ''एकदा का RIL ने KG-D6 क्षेत्रातून वायु उत्पादन करण्यातील तांत्रिक अडचणी दूर केल्या की सरकारने त्यांच्याकडून उत्पादनातील तूट $४.२ MMBTU या जुन्या दरानेच भरून घ्यावी, त्यासाठी नव्या दराचा फायदा त्यांना देऊ नये.''

याला पेट्रोलियम मंत्री उत्तर देतात,

''४ जुलै च्या वित्त मंत्रालयाच्या नोट सोबत दोन वृत्तपत्रांतील संपादकीय लेख जोडले आहेत. व काही मुद्दे उपस्थित केले आहेत. हे वित्त मंत्रालयाचे अधिकृत मत किंवा शंका म्हणता येणार नाही.

''याबाबतीत मते मांडतांना वित्त मंत्रालयाने वायुदरावर मर्यादा घालव्या अथवा RIL ने जुन्या दरानेच वायु पुरवठा करावा असे मुद्दे मांडले नव्हते. आता वेगवेगळे निष्कर्ष काढण्यास जागा नाही. CCEA चा निर्णय संपूर्ण चर्चेनंतर घेतला आहे. आम्ही तोच अंमलात आणू.''

**पेट्रोलियम मंत्र्यांनी त्यांच्यापेक्षा ज्येष्ठ अशा वित्तमंत्र्यांच्या सूचनेस वाटण्याच्या अक्षता लावाव्या, हे हास्यास्पद आहे.**

## या प्रकरणात भा.ज.प.ची भूमिका

देशाच्या अर्थव्यवस्थेवर भयानक परिणाम करेल अशा या प्रकरणात प्रमुख विरोधी पक्ष म्हणून भा.ज.प. पूर्ण ताकदीनिशी उतरेल अशी कोणीही अपेक्षा करेल. पण प्रत्यक्षात या सर्व प्रकरणात भा.ज.प. मूग गिळून गप्प बसला आहे! ह्या मुद्यांवर वृत्तपत्रांतून जाहीर चर्चा होत असतांना, आमची पंतप्रधानांना लिहिलेली पत्रे जाहीर झालेली असतांनाही भा.ज.प. मौन पाळून आहे. उलट **आऊटलूक** या नियतकालिकात या घोटाळ्यावर कव्हर स्टोरी आली तेव्हा त्यांनी तीन प्रमुख भा.ज.प. नेत्यांना त्यांची प्रतिक्रिया देण्याची विनंती केली होती. त्यातील प्रत्येकाने उडवाउडवीची उत्तरे देऊन आपले अंग काढून घेतले!

अर्थात RIL राजकीय पक्षांना देणग्या देणारा सर्वात मोठा उद्योग आहे हे आम्ही जाणतो. काँग्रेस एवढ्याच भा.ज.प. लाही RIL कडून देणग्या मिळतात. निवडणूका समोर येऊन ठेपल्या असतांना या घोटाळ्याबाबत न बोलणेच बरे असे त्यांनी ठरविलेले दिसते.

## निष्कर्ष

या सर्वातून हेच स्पष्ट होते की सरकारच्या आर्थिक निर्णय प्रक्रीयेवर रिलायन्सने कशी मजबूत पकड बसविली आहे. हा घोटाळा पेट्रोलियम मंत्री व वित्त मंत्री यांच्या मदतीने सुरु आहे. ही नैसर्गिक संपत्तीची लूट आहे. हा KG-D6 चा सर्वात मोठा घोटाळा असून जनतेत संतापाची लाट आहे.

आम्ही सरकारला विनंती केली आहे की त्यांनी वायुदर वाढविण्याच्या आपल्या निर्णयाचा फेरविचार करावा. व जोपर्यंत सर्व संबंधितांशी खुली चर्चा होत नाही तो पर्यंत तो निर्णय स्थगित ठेवावा.

हा संघर्ष साधा सोपा नाही. यात देशातील सर्वात मोठा उद्योग केंद्रस्थानी असून लाखो करोडो रुपयांची उलाढाल गुंतलेली आहे. आपल्याला हा संघर्ष चालविण्यासाठी सर्व व्यासपीठांचा उपयोग करून देशाच्या नैसर्गिक संपत्तीची सुरु असलेली लूट लोकांच्या निदर्शनास आणून द्यावी लागेल व रोकावी लागेल.

❑❑❑

**सहयोग मूल्य रुपये ५/-**

# दक्षिण मुंबई लोकसभा मतदार संघासाठी
# भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे उमदेवार



**कॉ. प्रकाश रेड्डी**

**निवडणूक चिन्ह**

***सिर्फ हंगामा खडा करना मेरा मकसद नहीं,***
***मेरी कोशिश है कि ये सूरत बदलनी चाहिए ।।***
***मेरे सीने मे नही तो तेरे सीने मे सही,***
***हो कही भी लेकिन आग जलनी चाहिए ।।***

---

हे पुस्तक कॉ. सुकुमार दामले, सचिव, भा.क.प. मुंबई कौन्सिल, यांनी
न्यू एज प्रिंटिंग प्रेस, प्रभादेवी, मुंबई - २५ येथे छापून प्रकाशित केले.